● शुक्रवार, दि. १८ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ८७ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनसेवा हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मराठा आरक्षणाचा जाहीरनाम्यात उल्लेख करणाऱ्या पक्षांचाच विचार करू-देशमुख



**जालना । प्रतिनिधी -** आरक्षणाबाबत आतापर्यंत मराठा समाजाला झुलवत ठेवण्यात आले. आचारसंहिता लागलीतरी निर्णय झाला नाही. आगामी विधानसभेसाठी ओबीसीतून म राठा आरक्षण देण्याबाबतचा मुद्दा जाहीरनाम्यात समाविष्ट करणाऱ्या पक्षांचाच विचार करू, अशा शब्दात अखिल भारतीय मराठा महासंघाचे जालना जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी महासंघाची भूमिका स्पष्ट केली.

श्री. देशमुख म्हणाले की, मराठा आरक्षणाचा संघर्ष खऱ्या अर्थाने १९८१ मध्ये माथाडी कामगार नेते आणि मराठा म हासंघाचे संस्थापक अण्णासाहेब पाटील यांनी सुरू केला. २२ मार्च १९८२ ला अण्णासाहेब पाटील यांनी मुंबईत मराठा आरक्षणासह इतर ११ मागण्यांसाठीचा पहिला मोर्चा काढला. बाबासाहेब भोसले हे तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. मराठ्यांचा हा मोर्चा पाहून सरकारला समस्यांची जाण झाली आणि मराठा आरक्षणाचा निर्णय जाहीर करू अशी ग्वाही दिली. पण दुर्दैवाने सरकार गडगडले आणि आरक्षणाचा निर्णय बासनात गेला. दुसऱ्याच दिवशी अण्णासाहेब पाटील यांचे निधन झाले. तेव्हापासून मराठा समाजाच्या संघटित बांधणीला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. गेल्या चार दशकांपासून ऐरणीवर असलेल्या मराठा आरक्षणासाठी लाखोच्या संख्येने मोर्चे निघाले. तमाम मराठा समाज रस्त्यावर उतरला. कित्येक आंदोलने झाली. मराठा समजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावे या म ागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या १३ महिन्यांत सहा वेळा उपोषण केले. सरकारने नुसते झुलवत ठेवले. आता विधानसभा निवडणुका लागल्या आहेत. जो पक्ष मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळवून देण्याबाबतचा मुद्दा पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यात नमूद करेल, मराठा समाजाचे प्रलंबित प्रश्न, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळात लघुउद्योगासाठी थेट कर्ज आदी म ुद्दे जो पक्ष अथवा युती, आघाड्या निवडणूक जाहीरनाम्यात समाविष्ट करेल, त्यांचाच विचार केला जाईल, असे अरविंद देशमुख यांनी म्हटले आहे.

### शाळेच्यावतीने विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेसाठी निवेदन

## पोलीसांची गस्त वाढवण्याची शिक्षकांची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** चंदनझिरा येथे अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणानंतर या भागातील सर्व माध्यमांच्या शाळांमधील विद्यार्थी हे प्रचंड दहशतीम ध्ये असून पालक वर्गात चिंतेचे वातावरण आहे. त्या अनुषंगाने गुरुवार (दि १७) रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास परिसरातील सर्व शाळेच्यावतीने चंदनझिरा पोलीस ठाण्यात पोलीस निरिक्षक सम्राटसिंग राजपूत यांना लेखी निवेदन देण्यात आले.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जालना शहरातील चंदनझिरा परिसरातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा भरतांना व सुटतांना काही रोडरोमियो विनाकारण शाळेसमोर चकरा मारतात, कर्कश होर्न वाजवणे, स्टंट बाजी करणे, झुंड करून शाळेच्या बाहेर उभा राहणे, मुलीकडे पाहून अश्लील इशारे करणे यासर्व प्रकारामुळे म ुलींना व महिलांना असुरक्षित वाटत आहे. या समाजविघातक प्रवर्त्ती हे विद्यार्थीनीच्या शिक्षणास बाधक ठरत आहेत. या संदर्भात यापुर्वी सुध्दा चंदनझीरा पोलीस ठाण्यास दि.१९ डिसेंबर २०२३ या रोजी परिसरातील सर्व शाळेतील मुख्याध्यापकांनी निवेदन दिलेले आहे. याची दखल त्यावेळी घेण्यात आली नसल्याचा आरोपही निवेदनात केला आहे.

या परिसरात अल्पवयीन मुलींवर अनैसर्गिक व अमानुष अत्याचार करून बालिकेला नाल्यात फेकून दिले. या हृदय पिळवून टाकणाऱ्या घटनेमुळे विद्यार्थी व पालकांमध्ये भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. याकरिता परिसरातील रोड रोमियो व समाजविघातक घटकावर बंधनकारक बंदोबस्त करण्यात यावा. शाळा भरतांना व सुटतांना पोलीस गस्त सुरु करावी. पोलीस दादा, पोलीस दीदी उपक्रम सुरु करावा, दामिनी पथकामार्फत विद्यार्थी यांना मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात यावे. पोस्को कायद्याच्या प्रसार व प्रचार जनजागृती आपल्या माध्यम ातून करण्यात यावे, या सर्व बाबीचा योग्य तो विचार करून विद्यार्थीच्या सुरक्षितेच्या दृष्टीने लवकरात लवकर दखल घेऊन परिसरात पोलिसांची गस्त सुरु करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आले आहे.

निवेदनावर श्री शिवाजीराव शेंडगे विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब आबुज, जीवनराव पारे शाळेचे मुख्याध्यापक सुभाष पारे, श्री विठ्ठल पान २ वर

### विधानसभा सार्वत्रिक निवडणुक मनुष्यबळाची पहिली सरमिसळ प्रक्रिया

## मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी यांची नियुक्ती



**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार जालना जिल्ह्यातील ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२-बदनापूर (अ.जा.) आणि १०३-भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघात बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदान होणार आहे. याकरिता मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात येणाऱ्या मनुष्यबळाची निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीद्वारे पहिली सरमिसळ (रॅण्डमायझेशन) प्रक्रिया जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या उपस्थितीत आज पार पडली. याद्वारे मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी रविंद्र पडूळकर, नायब तहसीलदार श्रीमती वैष्णव यांची उपस्थिती होती.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी जालना जिल्ह्यातील १ हजार ७५५ मतदान केंद्र आहेत. मतदान केंद्राध्यक्ष, प्रथम मतदान अधिकारी आणि इतर मतदान अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत मनुष्यबळाची पहिली सरमिसळ (रॅण्डमायझेशन) एकूण ९ हजार ८५५ अधिकारी- कर्मचाऱ्यांची करण्यात आली. त्यानुसार आता संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीचे आदेश वितरीत करण्याची कार्यवाही होणार आहे.

## समृद्धीच्या सभासदांची दिवाळी होणार गोड

### कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांची १०० रुपये वाढीव हप्त्याची घोषणा



**घनसावंगी । प्रतिनिधी -** समृद्धी साखर कारखान्याच्या सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गळीत हंगाम २०२३-२४ मधील गाळप झालेल्या उसाचा पहिला २८०० रुपये प्रती मे. टन प्रमाणे देण्यात आला. आता दिवाळी सणानिमित्त कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी १०० रुपये प्रती मे टन प्रमाणे वाढीव हप्ता देण्याची घोषणा केली आहे. हा वाढीव हप्ता दोन ते तीन दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात येणार आहे. अशी माहिती कारखान्याचे पान २ वर

## युवा आदर्श

### वाचन ...

प्रारंभी मिळे जे ते
करत रहावे वाचन
जागृत होई कुंडल
खुले आत्मा लोचन
जेष्ठ साहित्यिकांचे
घ्या नीत मार्गदर्शन
कोणते ग्रंथ पुस्तके
केले काय आलोचन
दिशामिळे वाचनास
जरुरीचे समालोचन
कुठले साहित्य नूतन
साहित्याचे विमोचन
बुध्दीवरती फवारणी
सतत ज्ञानाचे सिंचन
ज्ञानयाग वाचनरूपे
सरस्वती आशिर्वचन
वाचनालय देवालय
उपासना पूजाअर्चन
बहुतमूल्य व्यासपीठ
फिके पडे हिरे कांचन
पुरेसे ना फक्त वाचन
जोडीला हो विवेचन
वाचलेले आचरणात
सार्थ ज्ञानकण पचन
साहित्य चर्चा विमर्श
संग्रहण हवे प्रवचन
अंखडीत ठेवा वाचन
द्या स्वयं स्वता: वचन

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## पाण्याच्या टाकीला २४ तास सुरक्षा पुरविणारे बिनपगारी वॉचमन रुजू !

### सोशल मिडीयावर पोस्ट; मनपा कारभाराची उडविली खिल्ली





**जालना । प्रतिनिधी -** शहरातील नुतन वसाहत भागातील पाण्याच्या टाकीत मृतदेह आढळल्यानंतर त्या भागातील नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न सम ोर आहे. या प्रकाराबद्दल संतप्त प्रतिक्रीया समाज मनातून उमटत आहेत. विविध सामाजिक संघटना, पक्षांनी घटनेस जवाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. असे असले तरी एका व्हॉटस्ॲप ग्रुपवर चक्क मनपा कारभाराची खिल्ली उडविणारी पोस्ट टाकण्यात आली आहे. या पोस्टमध्ये नूतन वसाहत पाण्याच्या टाकीला २४ तास सुरक्षा पुरविणारे बिनपगारी वॉचमन १७/१०/२०२४ ४.१६ वाजता रुजू झाल्याचा मॅसेज टाकण्यात आला असून त्या सोबत पाण्याच्या टाकीवर एक कुत्रा असलेला फोटो शेअर करण्यात आला आहे. महत्वाचे म्हणजे ज्या व्हॉटसॲप ग्रुपवर हा मॅसेज आहे. त्या ग्रुपवर मनपाचे आयुक्तांसह विविध अधिकारी-कर्मचारी आहेत. तसेच विविध पक्षातील मोठे नेते, समाजसेवक, पत्रकार या ग्रुपवर आहेत. असे असतांना केवळ बघ्याची भूमिका निभावत आहे. मुळात हा मॅसेज टाकणारा व्यक्ती मनपाचाच कर्मचारी असल्याचे समोर येत आहे. गंभीर घटनेनंतर अशा प्रकारची पोस्ट टाकून नेमका काय संदेश द्यायचा हा मुद्दा उपस्थित होतो. मनपा कारभाराची खिल्ली पान २ वर

## मतदार यादीत नाव सामाविष्ट करण्यासाठी अद्यापही वेळ




**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम नुकताच जाहीर करण्यात आला आहे. मतदार यादीत नाव सामाविष्ट करण्यासाठी अद्यापही वेळ असून येत्या दोन- तीन दिवसात मतदार यादीत नाव सामाविष्ट करण्याची प्रक्रिया नव मतदार करु शकतात असे जिल्हा निवडणुक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले आहे. नाव सामाविष्ट करता येईल मात्र, नाव वगळण्याची प्रक्रिया आता पुर्णपणे बंद झाली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. विधानसभा निवडणुकीमध्ये संबंधित जिल्ह्यातील नागरीकांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदार यादीत आपले नाव असणे आवश्यक पान २ वर

## ज्येष्ठ डॉक्टरांचा सेवा गौरव सोहळा संपन्न

### मंठा मेडिकल असोसिएशनचा स्तुत्य उपक्रम



**योगेश गणगे**

**मंठा -** मंठा तालुक्यासह पंचक्रोशीत मागील तीस वर्षापासून वैद्यकीय सेवा देणाऱ्या ज्येष्ठ डॉक्टरांचा सेवा गौरव सोहळा मंठा मेडिकल असोसिएशन तर्फे घेण्यात आला.

या सेवा गौरव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंठा येथील ज्येष्ठ डॉ विश्वासराव बागवे होते. उद्धाटक म्हणून ज्येष्ठ डॉ व्ही. बी केंधळे, आणि साईनाथ पवार (अध्यक्ष आर डब्लू सी ए जालना) यांची प्रमुख उपस्थिती होती. तर व्यासपीठावर रामेश्वर कोटकर, डॉ प्रभाकरराव कुलकर्णी, सुभाष जगताप, किरण बावस्कर, दिलीपराव जायभाये, डॉ बी जे काळे, डॉ सुनील सरकटे, डॉ श्रीधर भाग्यवान, डॉ विष्णुपंत जायभाये यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. ज्येष्ठ डॉ एच के शर्मा, डॉ पी एम शेंडगे, डॉ यु बी बोडखे, डॉ वी एस भगस, डॉ ए डी बोराडे, डॉ के के कम ळकर, डॉ शिवाजीराव गणगे, दत्तप्रसाद झंवर, संजय छल्लाणी, यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात भगवान धन्वंतरी यांच्या पूजनाने झाली. प्रास्ताविकात बोलताना मंठा मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष श्याम काकडे यांनी वैद्यकीय क्षेत्रात मागील तीस वर्षापासून सेवा देणाऱ्या डॉक्टरांच्या कार्याचा उल्लेख केला. कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती असलेले साईनाथ पवार यांनी तीस वर्षापासून डॉक्टरांनी कठीण परिस्थितीत दिलेल्या सेवेबद्दल त्यांचे पान २ वर

# संपादकीय

## भारत - कॅनडा तणावाला ट्रूडोच जबाबदार

कॅनडा आणि भारताचे संबंध कमालीचे तणावग्रस्त बनले आहेत. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रूडो यांनी खलिस्तान फुटीरतावादी नेते हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येत भारतीय गुप्तचर यंत्रणेचा हात असल्याचा आरोप केला इतकेच नाही तर भारतीय दूतावासातील उच्चायुक्त संजय कुमार वर्मा यांचा या हत्येशी थेट संबंध जोडण्याचा प्रयत्न केला. कॅनडातील एकंदर परिस्थिती पाहून भारताने कॅनडा मधील आपल्या अधिकाऱ्यांना माघारी बोलावून नवी दिल्लीतील कॅनडाच्या उच्चायुक्त कार्यालयातील सहा अधिकाऱ्यांची हकालपट्टी केली. कॅनडाने मागील वर्षीच हरदिपसिंग निज्जर याचा हत्येत भारताचा हात असल्याचा आरोप केला होता तेंव्हाच हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा कोणताही हात नाही असे भारतीय परराष्ट्र खात्याने सांगितले होते त्यानंतर काही काळ गप्प बसलेल्या ट्रुडो यांनी पुन्हा तीच खेळी करत नव्हे त्याहीपेक्षा पुढची खेळी करीत ही कारवाई केली. कॅनडाच्या या कारवाई नंतर भारतानेही कॅनडाच्या सहा वरिष्ठ अधिकाऱ्याची हकालपट्टी करून जशास तसे उत्तर दिले. या घटनेनंतर दोन्ही देशातील तणाव कमालीचा वाढला आहे आणि याला सर्वस्वी कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो हेच जबाबदार आहे. खलिस्तान या फुटीरतावादी संघटनेवर भारताने बंदी घातली आहे मात्र कॅनडा या देशाने खलिस्तानला कायम समर्थन दिले आहे. याच संघटनेने भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या घडवून आणली आहे. भारतापासून अलग होऊन स्वतंत्र खलिस्तान राष्ट्र निर्माण करणे हे या संघटनेचे ध्येय आहे. १९८० च्या दशकात ही संघटना खूप आक्रमक होती. ही संघटना भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देत आहे म्हणून भारताने तिच्यावर बंदी घातली मात्र आजही या फुटीरतावादी संघटनेचे काम चालूच आहे. या संघटनेला परदेशातून विशेषतः कॅनडा या देशातून आर्थिक आणि सामरिक मदत मिळते. १९८० च्या दशकात जेंव्हा खलिस्तान चळवळ जोमात होती तेंव्हा पासूनच कॅनडामधून त्यांना आर्थिक रसद पुरवली जात होती. आज ४० वर्षानंतही परिस्थिती बदलली नाही. आजही कॅनडा सरकार खलिस्तानचे उघड समर्थन करत आहे. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो हे खुलेआम खलिस्तानवादयांचे समर्थन करत आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळात खलिस्तान समर्थक मंत्र्यांचा समावेश आहे. अमृतपाल सिंग या खलिस्तानी अतिरेक्याला भारताने अटक केल्यावर विदेशातील खलिस्तान समर्थक कॅनडामध्ये एकवटले आहेत. कॅनडामध्ये भारतविरोधी कारवाया पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रुडो यांना भारतविरोधी खलिस्तानवाद्यांवर कारवाई करण्याची मागणी केली परंतु ट्रुडो यांनी पंतप्रधानांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. एव्हढेच नाही तर मागील वर्षी टोरोंटो आणि ओंटोरिया या शहरात खालसा स्थापना दिनाच्या कार्यक्रमाला त्यांनी हजेरी लावली. तिथे त्यांचे खलिस्तानचा ध्वज देऊन स्वागत करण्यात आले. ट्रुडो यांच्या या भूमिकेचा भारत सरकारने तीव्र शब्दात निषेध केला मात्र भारताच्या निषेधाकडे ट्रूडो यांनी दुर्लक्ष करत खलिस्तानला समर्थन देणे चालूच ठेवले. ट्रुडो यांची खलिस्तानवाद्यांना समर्थन देण्याची फुटीरतावादी भूमिका म्हणजे भारतविरोधी शत्रुत्वाची भावना आहे. वास्तविक भारताने कॅनडासोबत कायम मित्रत्वाचे संबंध ठेवले आहे. भारत कॅनडाला मित्रच मानतो मात्र कॅनडा फुटीरतावाद्यांना पाठबळ देत आहे त्यामुळे भारताने याची गंभीरपणे नोंद घेऊन कॅनडाला खडसावले. त्यामुळेच जस्टीन ट्रूडो यांनी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येचे भांडवल करून भारताशी पंगा घेतला आहे. अर्थात कॅनडा हे एकट्याच्या जोरावर करत नाही हे उघड आहे कॅनडाला काही देशांचा छुपा पाठिंबा आहे. पाकिस्ताननेही या वादात उडी घेऊन कॅनडा ला पाठिंबा दिला आहे. सातत्याने हा वाद उकरून कढण्यामागे जस्टिन ट्रूडो यांचा राजकीय स्वार्थ आहे पुढील वर्षी कॅनडात निवडणुका होणार असून ट्रूडो हे पुन्हा निवडणुकीस उभे राहणार आहे. मात्र परिस्थिती त्यांना अनुकूल नाही. बेरोजगारी, महागाई यामुळे त्यांच्या विषयी तेथील नागरिकात प्रचंड नाराजी आहे निवडणूक पूर्व सर्व्हेक्षणात त्यांच्या पक्षाची पिछेहाट दिसत आहे त्यामुळे कॅनडात असलेल्या साडे सात लाख शीख नागरिकांची मते आपल्या बाजूने वळावित यासाठी त्यांनी पुन्हा हा वाद उकरून काढला आहे. वास्तविक या हत्येमागे भारताचा हात नाही असे भारताने स्पष्ट केले असतानाही ट्रूडो यावरून भारताशी वारंवार वाद उकरून काढत आहे. वास्तविक खलिस्तान ही फुटीरतावादी संघटना आहे ती भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देते आहे. भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणारे किंवा फुटीरतावाद्यांना पाठबळ देणारे आमचे मित्र होऊ शकत नाही असे भारताने कॅनडाला ठणकावून सांगायला हवे. जोवर कॅनडा फुटीरतावाद्याना समर्थन आणि पाठबळ देणे थांबवत नाही तोवर दोन्ही देशातील संबंध पूर्ववत होणार नाही अशी भारताने ठोस भूमिका भारताने घ्यायला हवी इतकेच नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील हा मुद्दा उचलून धरायला हवा.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# खाद्य पुर्तीसाठी व उपासमारी रोखण्यासाठी ठोस नियोजन आवश्यक

विश्व खाद्य दिवस कृतीत बदलायला पाहिजे तेव्हाच जगातील उपासमारी संपुष्टात येईल.खाद्यांन्नाची समस्या पहाता संयुक्त राष्ट्रसंघाने १६ आक्टोंबर १९४५ ला खाद्य व कृषि संघटन ( एफएओ ) ची स्थापणा केली.कॉफ्रेस ऑफ द फूड एंड एग्रीकल्चर ऑर्गनाइजेश(एफएओ) ने १६ आक्टोंबर १९७९ पासून विश्व खाद्य दिवससाजरा करण्याची घोषणा केली.तेव्हापासुन जगात आंतरराष्ट्रीय विश्व खाद्य दिवस साजरा केल्या जातो.या दिवसांचा उद्देश म्हणजे जगातील वाढती भुकमरीची(उपासमारी) समस्यांच्या प्रती लोकांना जागरूक करने.उपासमारी, कुपोषण व गरीबीच्या विरूद्ध संघर्षाला मजबुती प्रदान करने.उपासमारीच्या समस्येकरीता संपूर्ण जग संघर्ष करीत आहे व उपासमारी, कुपोषण यातुन बाहेर निघण्यासाठी सर्वांचा संघर्ष सुरू आहे. भारताची अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करीत आहे.परंतु आजही कोट्यवधी भारतीयांची भूक भागत नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.तर भारताचे एक चीत्र असेही आहे की गोडाऊनमध्ये करोडोंटन अन्न-धान्य सडत आहे. तरीही भारतात करोडोंच्या संख्येने लोक उपाशी आहेत.याचा परिणाम म्हणजे जगात देशांची छबी मलीन होवुन बदनामी होवु शकते. विश्व खाद्य दिवस साजरा करण्याचा उद्देश म्हणजे जगातील उपासमारी (भुकमरी) संपुष्टात आणणे.परंतु जगाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की,या कार्यक्रमाच्या इतके वर्षांनंतरही सुध्दा आजही जगातील करोडो लोकांना आम्ही दोन वेळचे जेवन सुध्दा देवु शकत नाही हे जगाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.अन्न हे पुर्ण ब्रम्ह म्हटल्या जाते.कारण अन्नाशिवाय कोणीही जगु शकत नाही. मानव, जीवजंतू वन्यप्राणी जंगल संपदा यांना आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी अन्नाची आवश्यकता असते.त्यामुळे अन्नाच्या नासाडीबाबत जागरूकता आवश्यक आहे.अन्न-धान्य पिकवीण्याकरीता पाण्याची आवश्यकता असते. त्याचबरोर सजीव व निर्जीव या दोन्ही घटकांना पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. त्यामुळे अन्नाची संपूर्ण प्रक्रिया पाण्यावर अवलंबून असते. अन्न-धान्याला जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षा जास्त महत्व पाण्यालासुध्दा आहे. कारण पाणी रहाले तरच अन्नाचे उत्पादन होवु शकते.१६ आक्टोंबर संपूर्ण जग विश्व खाद्य दिवसम्हणुन साजरा करतात.कारण खाद्दांनाची जोपासना करणे अत्यंत गरजेचे आहे. आज जगातील प्रत्येक व्यक्ती रोजगार मीळवीण्यासाठी का धावपळ करतो?,मोल-मजुर, कामगार काम मिळावे म्हणून का धावपळ करतो? यामागे एकच उद्देश असतो वितभर पोटाची खळगी भरणे कारण काहीना काम मिळाले नाही तर उपाशीपोटी राहावे लागते हे सुद्धा अर्धसत्य आहे याला नाकारता येत नाही.करोणा काळात जगातील अनेक देशांमध्ये उपासमारीची समस्या ओढावली. होती.कारण या काळात करोडो लोकांचा रोजगार हिरावल्या गेला होता.त्यामुळे भारतासह अनेक देशांमध्ये उपासमारीची समस्या दिसून आली.या उपासमारीच्या संकटात अनेकांना आपले प्राणसुध्दा गमवावे लागले.अशाप्रकारचे उग्ररूप करोणा काळात दीसुन आले.जगात खाद्यांन्नाला कुठेही तडा जाऊ नये याकरिता शेतकरी वर्ग आपल्या अंगातुन घाम गाळतो व शेती पिकवितो.तेव्हाच देशासह जगातील लोकांच्या पोटाची खळगी भरते. म्हणुनच शेतकऱ्यांना अन्नदाता म्हणुन संबोधल्या जाते. शेतकऱ्यांनी जर अन्न पिकवीले नाही तर संपूर्ण जनतेवर उपाशी मरण्याची पाळी येवु शकते. परंतु मानवजातीला जिवीत ठेवण्याचे दायीत्व व जबाबदारी शेतकऱ्यांनी घेतली आहे.त्यामुळे सर्वप्रथम १६ आक्टोंबर विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने संपूर्ण शेतकरी बांधवांना मी शतशत प्रणाम करतो.कारण उन, पाऊस,थंडी,ओला दुष्काळ,कोरडा दुष्काळ, सुनामी आणि अकाल यांच्याशी संघर्ष करून शेतकरी शेतीतुन उत्पन्न काढत असतो.भारताला शेतकऱ्यांचा राजा संबोधल्या जाते म्हणजेच कृषिप्रधान देशपरंतु गेल्या ७६ वर्षांपासून आजही भारतीय शेतकरी दुःखी असल्याचे दिसून येते.कारण आजही शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला सरकार कडून योग्य भाव मिळत नाही.सरकारने कृषिविधेक पास केले परंतु या विधेयकाला शेतकऱ्यांचा आताही कडाडून विरोध आहे. सरकारकडुन बाजार समिती किंवा मंडीमध्ये योग्य भावाची घोषणा केली जात नाही. त्यामुळे भारतीय शेतकरी नाराज असल्याचे दिसून येते.आज शेतकऱ्यांचा विचार केला तर मनाने व स्थावर मालमत्तेच्या दृष्टीकोनातून करोडपती आहे.परंतु आर्थिकदृष्ट्या कंगाल आहे.कारण भारतात शेतकऱ्यांचे रक्त पिण्याचे काम दलाल,व्यापारी व राजकीय पुढारी वर्ग नेहमीच करतांना दिसतात.आज व्यापाऱ्याजवळ, राजकीय पुढाऱ्यांजवळ चारचाकी गाडी, बंगला,सोने-नाने,चल-अचल संपत्ती व अवैध संपत्ती दिसून येते हे आले कोठून? भारतातील शेतकरी राबराब राबतो परंतु आताही त्यांच्या नशिबी भोपळा आल्याचे दिसून येते.कारण कोणतीही सरकार असो ती पुर्णपणे व्यापाऱ्यांच्या व पुंजीपती यांच्या पाठीशी असल्याचे गेल्या ७६ वर्षांपासून आपण पहात आहोत. त्यामुळे आज शेतकरी वर्ग मगासलेला आहे.भारत स्वतंत्र झाल्यानंतर ही भारतीय शेतकऱ्यांनी जनतेला अन्न-धान्याची कमतरता पडू दिली नाही.परंतु चीनमध्ये १९७० मध्ये भुकमरीची महाभयानक लाट आली अशा परीस्थितीत चीनजवळ खायला अन्न-धान्य नव्हते म्हणुन त्यांनी अन्न-धान्याऐवजी कुत्रे, मांजर, पाल, साप,कीडे-माकोडे व अन्य प्राणी खायला सुरुवात केली.चीनची ही भयावह स्थिती पहाता चीन सरकारने प्रतीबंधीत प्रांण्यांना जनतेला नेहमी करीता खाण्याची परवानगी दिली.अशा कठीण परिस्थितीतुन जावुनसुध्दा आज चीन बलाढ्य देश बनला आहे.याचे संपूर्ण चीत्र आपल्याला वुहान प्रांतातुन दीसुन आले. परंतु भारतीय शेतकऱ्यांनी स्वतंत्र पुर्वकाळात व स्वतंत्र्यानंतरसुध्दा भारत वासीयांना अन्नची कमी पडु दीली नाही ही भारतीय शेतकऱ्यांची महानता आहे. परंतु सरकारच्या अन्न-धान्य साठ्याचे नियोजन गोडाऊन यांच्या कमतरतेमुळे दरवर्षी करोडो टन अन्नधान्य सडत असते आणि यातुनच उत्पन्न होते भुकमरी (उपासमारी)ची सुरुवात.आजही भारतात मेळघाट सारख्या अनेक भागात भुकमरी व कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते असे का?याचा अभ्यास राजकीय पुढाऱ्यांनी करण्याची गरज आहे.आज भारतात उलटी गंगा वाहतांना दीसते देशातील ६० टक्के शेतकऱ्यांकडे करोडो रुपयांची शेती आहे.परंतु आजही भारतीय शेतकरी गरीब आहे.याचे मुख्य कारण म्हणजे राजकीय पुढाऱ्यांनी व व्यापाऱ्यांनी आतापर्यंत शेतकऱ्यांचे फक्त रक्त पिण्याचे काम केल्याचे दिसून येते. त्यामुळेच आज भारतात अनेक भागातील अन्नदाता शेतकरी आत्महत्यां करतांना दिसतो.कारण त्यांची संपूर्ण शेती निसर्गावर अवलंबून असते.आतातर वातावरणातील बदलाने शेतकऱ्यांना अत्यंत कठीण परिस्थितीत आनुण ठेवले आहे.विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकरी सरकारला विचारते की मुठभर नगरसेवक,आजी-माजी आमदार-खासदार व मंत्री मेहनत न करता पाच वर्षांत करोडपती व अरबोपती कसेकाय होतात? राजकीय पुढारी शेतकऱ्यांपेक्षा एवढा मोठा आहे का?की त्याला गलेलठ्ठ पगार, पेन्शन,इतर भत्ते सरकार देते व शेतकऱ्यांना भोपळा देते.हे लोकशाहीच्या देशात चालत तरी काय?सर्व राजकीय पुढारी सांगतात की आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत.समान अधिकार,समान न्याय असे खोकले आश्वासन देतात.परंतु आजच्या परिस्थितीत राजकीय पुढारीच शेतकऱ्यांचा घात करतांना दिसत आहे.त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांच्या प्रती जागरूकता दाखवुन विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत केली पाहिजे.आंतरराष्ट्री माहितीनुसार जगात उपाश्यापोटी झोपणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे सांगण्यात येत आहे. संयुक्तराष्ट्र खाद्य आणि कृषिसंघटनानुसार २००२ च्या तुलनेत खाद्यान्नवस्तुच्या किंमतीत १४० टक्याने भारीभरकम वाढ झाली आहे.यामुळे डिसेंबर २००७ पासुन ४० देशांना खाद्यांन्न संकटाचा सामना करावा लागत होता.सध्या गेल्या १८ महिन्यांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध भयावह स्थितीमध्ये आहे आणि आणि आता अचानक इजरायल विरूद्ध हमास आतंकवाद्यांचा संघर्ष टोकाला पोहोचला आहे यात हमासच्या बाजुंनी अनेक इस्लामीक देश उडी घेण्याच्या तयारीत आहे म्हणजेच युध्दाचा भडका महाभयानक स्थितीत आहे.याचा परिणाम अन्नसाठ्यावर होवून अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते.भारतीय खाद्य निगमने स्वतः कबुल केले आहे की दरवर्षी गोदामातील ५० करोड रुपयांचा अनाज म्हणजे १०.४० लाख मीट्रिक टन पर्यंत अनाज सडतो किंवा खराब होतो.हीबाब कृषी प्रधान देशाच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर,दुःखद व चिंतेची आहे.कारण खराब होणारे अन्न-धान्य प्रत्येकवर्षी सव्वा करोड लोकांची भुक मीटवु शकते.परंतु भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की शेतकऱ्यांनी मेहनतीने तयार केलेला लाखो टन अनाज सडतो आणि यामुळेच भुकमरीची समस्या उद्भवत आहे याला नाकारता येत नाही.यामुळेच भारतात करोडो लोक उपाश्यापोटी झोपतांना दीसतात.भारताची हेही समस्या आहे की सहा वर्षांखालील ४७टक्के मुले कुपोषणाची शीकार होत आहे.एफएओच्या माहिती नुसार भारतात २००९ मध्ये २३ करोड १० लाख लोक भुकमरीचा सामना करीत होते.त्यामुळे आजही भारतात भुकमरीची संख्या कमी न होता दीवसें-दीवस वाढतच आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.ग्लोबल हंगरच्या इंडेक्सने जारी केलेल्या २०२३ च्या आकडेवारीनुसार भारताचा विश्व भुकमरी सुचकांकमध्ये १२५ देशांच्या तुलनेत १११ वा नंबर लागतो ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे.या उलट भारताच्या शेजारील देशांचा विचार केला तर त्यांची परिस्थिती भारतापेक्षा चांगली आहे यात पाकिस्तान- १०२, बांगलादेश-८१, नेपाळ-६९, श्रीलंका -६० व्या स्थानावर आहे.गेल्या काही महिन्यांपासून देशातील २० कोटी लोकांना मोफत अन्न-धान्याची प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनाअसतांना सुध्दा भुकबळीची संख्या वाढत आहे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.भारतात सर्वेमध्ये हेही लक्षात आले की लग्नसमारंभ, महाप्रसाद व अन्य जेवणाच्या कार्यक्रमात हजारो टन खाद्यान्न वाया जाते.याला कोठेतरी रोखलेच पाहिजे. आजच्या परीस्थितीत अन्नाचा प्रत्येक कन वाचवीण्याची गरज आहे.आज अन्नाचा प्रत्येक दाना महत्वाचा आहे. तेव्हाच म्हणतात दाने दाने पे लिखाण है, खाने वाले का नाम या म्हणीची पुर्ततः होवु शकते.आज १४० कोटी जनतेचे दायीत्व बनते की अन्नाचा प्रत्येक कण वाचवुन देशातील उपासमारी व कुपोषण यावर अंकुश लावला पाहिजे.विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने मी १४० कोटी जनतेला विनंती करतो की अन्नाचा एक-एक कन वाचवीण्याची नीतांत गरज आहे. कारण देशातील वाढती लोकसंख्या व जगातील युद्धजन्य परिस्थिती पहाता अन्न-धान्याचे जतन करने अत्यंत गरजेचे आहे.कारण भारतात बालकांच्या कुपोषणाची स्थिती अत्यंत वाईट आहे.त्याचप्रमाणे मी सरकारला आग्रह करतो की अन्न-धान्याचा काळाबाजार ताबडतोब रोखला पाहिजे व जमाखोरांच्या प्रती कठोर पाऊल उचलुन त्यांच्या मुसक्या आवरल्या पाहिजे.तेव्हाच विश्व खाद्य दिवसाला खरे महत्व येईल. संपुर्ण जग एकीकडे खाद्यांनासाठी आठा-पीटा करून वन-वन हिंडत आहे तर दुसरीकडे संपूर्ण जग युद्धाच्या उंबरठ्यावर येऊन बारूदच्या ढीगाऱ्यावर बसल्याचे दिसून येते. म्हणजेच आज जगात खाद्यान्ना पेक्षा दारूगोळ्याला जास्त महत्व दील्याजात आहे.याला कोठेतरी रोखलेच पाहिजे अन्यथा अनर्थ होवू शकतो.याकरिता जीवन जगण्यासाठी खाद्यांनाकडे प्रत्येक देशांनी तत्परता दाखवुन उपासमारी, कुपोषण,भुकमरी याला पुर्णविराम लावण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले पाहिजे यातच जगाचे कल्याण आहे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## पान १ वरुन

### पोलीसांची गस्त

प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शुभांगी यमुल, ह्विजन ईंग्लिश स्कूलच्या सौ. लता विलास सावंत, मदिनातुल ऊलूम उर्दू शाळेचे मुख्याध्यापक जलील, सिल्वर ज्युबली ईंग्लिश स्कुलचे ए एस पवार, श्रीमती ए सी सुर्यवंशी, शहीद एहसान जाफरी उर्दू माध्यमिक शाळेचे अंसारी काशीद, राजू साळवे, शिंदे यांच्यासह ज्ञानदिप प्रा.शाळा, गिरिश ईंग्लिश स्कुल, के.पी.अग्रवाल हायस्कुल, शहिद भगतसिंग विद्यामंदिर आदी शाळेच्या मुख्याध्यापक व शिक्षकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### समृद्धीच्या सभासदांची

चेअरमन सतीश घाटगे यांनी मंगळवारी (दि.१७) दिली आहे.शेतकऱ्यांच्या उसाला समृद्धी कारखाना उच्चांकी भाव देत असल्याने शेतकरी आनंदी आहेत. उच्चांकी भावाची परंपरा यंदाही 'समृद्धी'ने कायम ठेवली असून पहिला हप्ता २ हजार ८०० रुपये प्रतीटन प्रमाणे दिल्यानंतर दिवाळी सणासाठी १०० रुपयाचा वाढीव हप्ता देण्याचा निर्णय सतीश घाटगे यांनी जाहीर केला आहे.
कपाशी, सोयाबीन या पिकाचे अतिवृष्टीत नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून हातात पैसा आला नाही. आर्थिक अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी समृद्धीने १०० रुपयाचा वाढीव हप्ता देण्याचा निर्णय घेतला. लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा होईल अशी माहिती समृद्धीचे चेअरमन सतीश घाटगे यांनी दिली.

### पाण्याच्या टाकीला

एक प्रकारे उडविली जात असून दुसरीकडे इमानदार घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुत्र्याचा हा अवमान नाही का? असाही प्रश्न उपस्थित होतो आहे. यावर मनपा आयुक्त काय भुमिका घेतात हे लवकरच स्पष्ट होईल.

### मतदार यादीत नाव

आहे. या निवडणूकीत वापरल्या जाणाऱ्या मतदार यादीत नाव येण्यासाठी नमुना अर्ज क्र. ६ च्या अर्जाव्दारे नोंदणी करण्याचा शेवटची तारीख १९ ऑक्टोबर २०२४ हा आहे. वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या नागरीकांनी 'मतदाता सेवा पोर्टल https://voters.eci.gov.in/ आणि 'वोटर हेल्पलाइन ॲप' (Voter Helpline PP) यावर ऑनलाइन सुविधाचा वापर करुन १९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करण्याकरीता नमुना क्र. ६ च्या अर्जाव्दारे नोंदणी करावी, असे आवाहनसह जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पांचाळ यांनी केले आहे.

### ज्येष्ठ डॉक्टरांचा

आभार मानले व पुढेही आपल्या हातून अशीच सेवा घडत राहो आणि भावी जीवनाबद्दल आरोग्यदायी शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना डॉ असोसिएशनच्या वतीने अध्यक्ष डॉ बी जे काळे यांनी मेडिकल असोसिएशने राबवलेल्या या उपक्रमाची भरभरून स्तुती केली व आभार मानले तसेच या अनुषंगाने डॉ रमेश सूर्य यांनी आपल्या मनोगतातून वैद्यकीय सेवा देताना आलेल्या अडचणीवर मात करीत डॉक्टर्स अविरत परिश्रम घेतात, नागरिकांनी ही बाब समजून सहकार्य करावे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक प्रदीप देशमुख यांनी केले तर आभार मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष सुनील बोडखे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मेडिकल असोसिएशनच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी तथा पॅथॉलॉजी असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. सायंकाळी ०७ वाजता सुरू झालेल्या या आगळ्या-वेगळ्या सोहळ्याचे स्नेहभोजन व कोजागिरी दुग्धपानानंतर कार्यक्रमाचे समापन करण्यात आले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करावेत

**जालना-** इयत्ता अकरावी तसेच इयत्ता बारावी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळालेल्या ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही. अशा विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाहभत्ता व इतर आवश्यक सुविधावर खर्च करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना लागू केली आहे. तरी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या पोर्टलवर दि. ३१ नोव्हेंबर २०२४ पर्यत ऑनलाईन सादर करावेत. असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. योजनेतंर्गत जालना महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या महाविद्यालयांमध्ये इयत्ता अकरावी तसेच बारावी नंतर व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्याना शासन निर्णयानुसार देय असलेली रक्कम मंजुर केली जाते. सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रूपये २ लाख ५० हजार रुपयांच्या आत असणे अपेक्षित आहे. अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यास दहावी, अकरावी व बारावी या अभ्यासक्रमात किमान ५० टक्के गुण असणे अपेक्षीत आहे. तसेच दिव्यांगासाठी ४० टक्के गुण असणे अपेक्षीत आहे. विद्यार्थ्याची महाविद्यालयातील उपस्थिती किमान ७५ टक्के अनिवार्य आहे. ज्या विद्यार्थ्यानी यापुर्वी वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन पोर्टलद्ववारे अर्ज सादर केले आहेत अशा विद्यार्थ्यांना अर्ज दाखल करण्याची आवश्यकता नाही. असेही कळविले आहे.

# माळशेंद्रा येथील नवयुवक खोतकर यांच्या उपस्थितीत शिवसेनेत!



**जालना । प्रतिनिधी -** युवकांचा ओढा हा शिवसेनेकडे का आहे तर त्याला कारणही तसेच आहे. कोणत्याही युवकाकडे दुर्लक्ष करण्याची सवय शिवसेनेला नाही. आलेल्या प्रत्येक कार्यकर्त्यांला न्याय दिला जाईल, अशी ग्वाही शिवसेनेचे नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुन खोतकर यांनी येथे बोलतांना दिली.

श्री. खोतकर म्हणाले की, शिवसेनेत येणार्या नवयुवकांकडे कदापिही दुर्लक्ष केले जाणार नाही. त्यांनाही न्याय दिला जाईल, असे सांगून श्री. खोतकर म्हणाले की, देशात आणि राज्यातही एकाच विचाराचे सरकार असल्यामुळे त्याचा लाभ अलगदपणे राज्याला होतो. त्या अनुषंगानेच हे राज्य पुढे चाललेले आहे. त्यामुळे येणार्या काळात आणि आगामी निवडणूकीतही युवकांनी तन- मन- धनाने काम केल्यास त्याचा फायदा हा शिवसेनेलाच होणार असल्याचेही श्री. खोतकर यावेळी म्हणाले.

यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते यांची विशेष उपस्थित होती. तर प्रवेश कर्त्यांमध्ये राजू लोखंडे, गणेश लोखंडे, कैलास लोखंडे, प्रकाश लोखंडे, सुनिल लोखंडे, विजय लोखंडे, विशाल लोखंडे, वकरास लोखंडे, सखाराम घुले, सुभाष काटकर, गजानन जाधव, मनोहर लोखंडे, लहु लोखंडे, भारत साठे, अनिल लोखंडे, शंभु लोखंडे, अजय लोखंडे आदींचा समावेश आहे. याप्रसंगी अनेक शिवसैनिक, पदाधिकार्यांची उपस्थिती होती.

# स्थानिक गुन्हे शाखेची हातभट्टी दारू अड्ड्यावार छापेमारी

## चार लाख सत्तावीस हजाराचा मुद्देमाल पोलीसांनी केला जप्त

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील नूतन वसाहत आणि कैकाडी मोहल्ला भागात गुरुवार (दि १७) रोजी स्थानिक गुन्हे शाखेने वेगवेगळ्या दोन ठिकाणी अवैध गावठी दारू अड्ड्यावर छापे मारी करून दोन्ही ठिकाणी मिळून एकुण चार लाख सत्तावीस हजाराचा मुद्देमाल जप्त करून हातभट्टीसाठी वापरण्यात येणारे रसायन व कच्चा माल पोलीसांनी नष्ट केले.

या विषयी सविस्तर माहिती अशी की, आज दि.१७ गुरूवार रोजी सकाळी १० वा.च्या सुमारास नूतन वसाहत भिगात गावठी हातभट्टी चालक बिरजू आत्माराम कुमावत वय ४० वर्षे रा.नूतन वसाहत याच्या घरी छापेमारी करून स्थानिक गुन्हे शाखेने दोन लाख तेवीस हजार चारशे रू. चा मुद्देमाल आढळून आला. त्यानंतर लक्ष्मीबाई रमेश पवार वय ४६ वर्षे रा. कैकाडी मोहल्ला यांच्या हातभट्टी अड्ड्यावर पोलीसांनी छापेमारी करून दोन लाख चार हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आले असल्याची माहिती आज दिनांक १७ गुरुवार रोजी दुपारी एक वयाच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी दिली..



सदरील कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंदत कुलकर्णी,

पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि योगेश उबाळे, पोहवा कांबळे, पोहवा हजारे, पोहवा लोखंडे, पोहवा गोशिक, पोहवा आडेप, पोना पटेल, पोकों चेके, पोकॉ भोसले, रमेश राठोड, पोहेकॉ रुस्तुम जैवाळ, पोहेकॉ जगदीश बावणे, पोहेकॉ संभाजी तनपुरे, मपोना चंद्रकला शउमल्लु, पोना सतीष श्रीवास, पोना देवीदास भोजणे, पोकॉ भागवत खरात, पोकॉ सोपान क्षीरसागर यांच्या वतीने कारवाई करण्यात आली.

# 'त्या' जलकुंभाची महापालिकेकडुन स्वच्छता

## आशा सेविका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांकडून दीड हजारांवर परिवाराची तपासणी

**जालना । प्रतिनिधी -** मृतदेह आढळलेल्या नुतन वसाहत येथील जलकुंभाची जालना महापालिका प्रशासनाकडून स्वच्छता करण्यात आलीय. मृतदेह आढळलेल्या जलकुंभातून ज्या भागात पाणी पुरवठा केला होता त्या ठिकाणच्या नागरिकांची वैद्यकीय कर्मचाऱ्यांकडून तपासणी करण्यात येतेय. आशा सेविका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांकडून आता पर्यंत १५८४ घरांची तपासणी करण्यात आली असल्याचं जालना महापालिका आयुक्त संतोष खांडेकर म्हणालेत. तपासणी केल्या पैकी २४ ठिकाणी नागरिकांना उलट्यांचा त्रास जाणवला तर एकाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं असं आज दिनांक १६ मंगळवार रोजी पाच वाजेच्या सुमारास महानगरपालिका आयुक्त खांडेकर म्हणालेत. आमची आरोग्य तपासणी सुरू असून पाण्याच्या टाकीची स्वच्छता करण्यात आल्याच खांडेकर म्हणालेत. नागरिकांनी मनात कुठलीही शंका ठेवू नये असं आवाहन करत आरोग्याच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना जालना महापालिकेच्या वतीने करण्यात आल्या असल्याचं



संतोष खांडेकर यांनी म्हटले आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या त्रुटी पुर्ततेसाठी आवाहन

**जालना-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शासन निर्णयान्वये शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना कार्यान्वित केली आहे. सन २०२१-२२, सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या वर्षामध्ये अर्ज सादर केलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत त्रुटीची पुर्तता केली नाही त्यांना स्वाधार योजनेचे अनुदान त्यांच्या बँक खात्यावर अदा करता आले नाही. तरी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी अर्ज सादर केलेल्या व अद्यापपर्यंत त्यांच्या खात्यावर अनुदान जमा न झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी समाज कल्याण कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहुन अर्जातील त्रुटीची पुर्तता दि. २४ ऑक्टोबर पर्यत करावी, असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# महात्मा फुले सार्वजनिक वाचनालय वाचन प्रेरणा दिवस साजरा



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** भारताचे माजी राँष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त महात्मा फुले सार्वजनिक वाचनालय टेंभुर्णी येथे आयोजित वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला.

यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राध्यापक डॉ अरुण आहेर हे होते तर प्रमुख पाहुणे मा सरपंच तथा गाव तंटामुक्त समिती अध्यक्ष विष्णू जमधडे चेअरमन भिकन खाँ पठाण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब अंभोरे आदीची उपस्थिती होती यावेळी माजी राँष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जीवनावर आधारित मार्गदर्शन करण्यात आले मुलांनी वाचन लेखन करण्यासाठी पालकांनी त्यांनी सार्वजनिक वाचनालयात घेऊन यावे वाचाल तर वाचाल वाचन संस्कृती टिकविण्यासाठी शाळेतील विद्यार्थी व स्पर्धा परीक्षा ची तयारी करणारे विद्यार्थ्यांनी सार्वजनिक वाचनालयातील ग्रंथ संपदा वाचन करावी असे आवाहन डॉ अरुण आहेर यांनी केले यावेळी सुत्रसंचालन एस के कांबळे यांनी तर आभार अनिकेत अंभोरे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी पालक उपस्थित होते.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४

# उमेदवारांना नामनिर्देशन दाखल करण्याच्या कार्यपध्दतीचे आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** भारत निवडणूक आयोगानेविधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी कार्यक्रम दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित केला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निवडणूकीच्या कालावधीत जालना जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळी वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहने यांचा ताफ्यात समावेश नसावा. उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात तसेच दालनात पाच व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकांपासून आदर्श आचार संहिता अंमलात आली आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यात विधानसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटार गाड्या, वाहने यांचा समावेश नसावा. तसेच नामनिर्देशन पत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांचे दालनात पाच व्यक्ती उपस्थित राहतील. या व्यतिरिक्त कोणालाही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात प्रवेश दिला जाणार नाही. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणने आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. आदेश दि. १५ ऑक्टोबर रोजीचे ६ वाजेपासुन ते दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजीचे २४ वाजेपर्यंत संपूर्ण जालना जिल्ह्यात अंमलात राहतील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# वाहनावर पक्ष प्रचाराचे कापडी फलक, झेंडे लावण्यासंबंधीच्या नियमाचे आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी** - भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठीचा कार्यक्रम दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासुन आदर्श आधार संहिता अंमलात आलेली आहे. सदर निवडणूकीचे प्रचार मोहिमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक हे निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचे फलक लावणे, झेंडे लावणे आदिबाबत बंधन घालणे आवश्यक झाले आहे. तरी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये निर्बंध घालण्यात आले आहेत. असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजुला विंड स्क्रिन ग्लासच्यापुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून २ फुट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनावर कापडी फलक वाहन चालकाच्या आसना मागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजुने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजुस तो लावता येणार नाही. फिरत्या वाहनांवर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहना व्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही. हे आदेश निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहतील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# शहरातील मंडल कार्यालय परिसरात तरूणावर चाकू हल्ला

**दोन जणांविरोधात सदर बजार पोलिसात गुन्हा दाखल**

**जालना । प्रतिनिधी -** मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी गणेश सत्यकुमार अडवाल (वय २७ वर्ष) व्यवसाय कालिका कंपनी तील कामगार राहणार रामनगर विणकर कॉलनी जालना यास दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी संशयित आरोपी सतीश झाडीवाले व कार्तिक तिरुखे या दोघांनी दिनांक १४ रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास मंडल ऑफिस जवळ शिवीगाळ करत जीवे मारण्याच्या उद्देशाने पोटात छातीवर धारदार चाकूने हल्ला करून जखमी केले आहे, यावेळी फिर्यादी यांचा मित्र व आलुगोंडा हा वाद मिटवण्यासाठी मदत आला असता त्याला सुद्धा या संशयित आरोपींनी जीवे मारण्याची धमकी दिली आहे . गणेश सत्यकुमार अडवाल यांच्या फिर्यादीवरून शितीष झाडीवाले, कार्तीक तिरुखे दोन्हीही संशयित आरोपी विरोधात दिनांक १७ बुधवार रोजी दुपारी बारा वाजेच्या सुमारास सदर बाजार पोलीस ठाण्यामध्ये कलम १०९,११८(१),३५२, ३५१(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा पुढील तपास सदर बाजार पोलीस करत असून जखमीवर रुग्णालयात उपचार सुरू आहे.

## महर्षि वाल्मिकी यांना अभिवादन

**जालना-** जिल्हाधिकारी कार्यालयात महर्षि वाल्मिकी यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार विक्रांत मोंढे, सतिश तायडे, तुषार निकम उपस्थिती होती.



**बालाजी मंदिर संभाजी नगर जालना येथे २५ वर्षापासून सेवा बजावणारे शरद हरणे यांची मुलगी आराध्या हरणे हिचे गोदावरी संगीत महाविद्यालय जळगाव यांनी आयोजित केलेल्या गोदावरी करंडक राज्यस्तरीय भावगीत स्पर्धेत प्रथम आल्याबद्दल अभिनंदन करताना बालाजी ब्रह्मोत्सव सेवा समितीचे सदस्य.**

# नागरिकांना गैरप्रकार सुरू असल्याचं समजताच पोलिसांशी संपर्क साधावा

## पोलिस अधीक्षकांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा पोलिस प्रशासन क्शन मोडवर आलंय. जिल्ह्याच्या सीमांवर नाकाबंदी करून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी केली जाणार आल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी दिलीय. बीएसएफ ची एक कंपनी आणि स्थानिक पोलिसांकडून जिल्ह्यातील संवेदनशील ठिकाणी जाणून पथसंचलन उद्या पासून करण्यात येणार असल्याचं पोलिस अधीक्षक म्हणालेत. नागरिकांना गैरप्रकार सुरू असल्याचं समजताच त्यांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा आणि उत्स्फूर्तपणे मतदानाचा हक्क बजावावा असं आवाहन आज दिनांक १६ बुधवार रोजी चार वाजेच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालया पोलिस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी नागरिकांना केलंय.

# पंडितराव बोराडे यांना मराठवाडा भूषण पुरस्कार प्रदान

**योगेश गणगे**

**मंठा -** मराठवाडा सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य सामाजिक संघटना असून सर्व जाती धर्म, जात,पंथ च्या पलीकडे असुन फाऊंडेशन ने नाशिक मध्ये

दसरा मेळाव्या निमीत्ताने दि १३ ऑक्टोबर २०२४ रोजी सिडको नाशिक येथे माऊली लॉन्स येथे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा मराठवाडा भूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना निस्वार्थीपणाने पत्रकारितेच्या माध्यमातून अन्याय विरोधात आणि गोरगरीब, पिडित यांच्यावर होतं असलेल्या अन्यायाविरुद्ध प्रखड लिखाण करुन न्याय मिळवून दिला. पंडितराव बोराडे यांनी विशेष काम केले आहे. तसेच मराठवाडा सामाजिक फाऊंडेशनचे ते प्रदेश सचिव असल्याने त्यामध्येही त्यांनी विविध सामाजिक कार्य केले आहे.

या कार्याची दखल घेऊन मराठवाडा सामाजिक फाउंडेशन नाशिक महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने त्यांना मराठवाडा भूषण पुरस्कार प्रदान करुन येथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, कामगार नेते डॉ डी.एल.कराड, भाजपा जिल्हाध्यक्ष सुनिल बच्छाव, डॉ. रमेश घाडगे, कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष शरद आहेर, आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत, आंतर राष्ट्रीय जिमनॅस्टिक खेळाडू अभिषेक शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष भाजपा प्रवक्ते लक्ष्मण सावजी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, जसा खांदेश महोत्सव नाशिक शहरात होतो त्याच प्रमाणे नाशिक मध्ये मराठावाडा महोत्सव सुरू करावा. व्यवस्थित



नियोजन करून एक चांगला उपक्रम या माध्यमातून सुरू करता येईल. यावेळी प्रमुख उपस्थितीत डॉ. डी.एल.कराड, सुनिल बच्छाव ,शरद आहेर, डॉ रमेश घाडगे बापुसाहेब शिंदे, आदींनी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आबासाहेब टरपले यांनी केले तर सुत्र संचालन पुनम शिरोळ यांनी केले.

उपस्थित मराठवाडा फाउंडेशनचे बी.एस.बोखारे ,डि.एस.कातारे, शरद राजबिंडे , जालना जिल्हाध्यक्ष रमेश देशपांडे , महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा मंठा तालुका अध्यक्ष पत्रकार बालाजी कुलकर्णी अशोक शेळके शिवाजीराव बल्लाळ, अजय आघाव, बाबासाहेब डख, नारायण वांढेकर, बापूराव टरपले, मुंजा शेळके, चिंतामण मुंडे, ओंकारेश्वर गांजवे, राजेंद्र तनपुरे, नामदेव नवघरे तसेच मराठवाडा सामाजिक फाउंडेशनचे पदाधिकारी व नाशिक शहर परिसरातील मराठवाड्यातील रहीवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शाहीर प्रा. प्रविण जाधव यांचा पोवाड्याचा कार्यक्रम झाला. तसेच नवरात्र निमित्त दसरा मेळाव्यात लकी ड्रॉ पद्धतीने एकावन्न महिलांना पैठणी वाटप करण्यात आल्या. पंडितराव बोराडे यांना मराठवाडा भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल जालना जिल्ह्यातील सर्व पत्रकार बंधू, सर्व पक्षांचे राजकीय नेते, पदाधिकारी, व सामाजिक क्षेत्रातील मंडळींनी त्यांचे स्वागत केले आहे. आभार प्रदर्शन किशोर शिरसाठ यांनी मानले. मराठवाडा भुषण मिळाला असल्याने बोराडे यांच सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# परतूर-मंठा विधानसभेसाठी वंचितच्यावतीने रामप्रसाद थोरात यांना उमेदवारी जाहीर

## २४ तारखेला भरणार नामनिर्देशनपत्र



**परतूर । प्रतिनिधी -** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी ओबीसी समाजाबद्दल घेतलेल्या ठोस भूमिकेला प्रभावित होऊन नुकताच मनमाड येथे रामप्रसाद थोरात यांनी वंचित बहुजन आघाडीमध्ये प्रवेश केला होता. त्यांना पक्षाने उमेदवारी जाहीर केली आहे. त्यांचा वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी सत्कार केला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या निवडणुकीत काहीही झाले तरी मी वंचित बहुजन आघाडी साठीच काम करणार असल्याचा शब्द उमेदवार रामप्रसाद थोरात यांनी कार्यकर्त्यांना दिला. ओबीसीची वज्रमुठ आणि एस.सी.,एस.टी. मायनॉरिटी,व्ही. जे.एन.टी.या समूहातील शोषित वर्गाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू बाळासाहेब आंबेडकर यांच्याशिवाय पर्याय नाही असा ठाम विश्वास रामप्रसाद थोरात यांना व्यक्त केला आहे. त्यामुळे या सर्व समाजातील लोकांनी वंचित बहुजन आघाडीलाच मतदान करा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

प्रसंगी रोहन वाघमारे वंचितचे तालुकाध्यक्ष रवींद्र भदर्गे, परतूर शहराध्यक्ष राहुल नाटकर, मंठा तालुका अध्यक्ष सुभाष जाधव,डॉ. किशोर त्रिभुवन,चोखाजी सौंदर्य, गौतम खंडागळे, सुरमा सिंग, गुलाब दवंडे, जुनी,सिद्धार्थ कांबळे,लक्ष्मण वंजारे, सुरेश वाघमारे, आशिष मोरे, हनुमंत मोरे, दयानंद साळवे, शिवाजी डोळस, भारत उघडे, बाबासाहेब शिंदे, रंगनाथ वटाणे,आनंद गरड, पांडुरंग शेजुळ, पवन राशेनकर, शेषराव आढे तसेच वंचित बहुजन आघाडीचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.